Estd :1962

A++ Accredited by NAAC (2021) with CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर

## पीएच.डी. प्रवेश सूचना २०२६—२७

शैक्षणिक वर्ष २०२६—२७ मधील पीएच.डी. प्रवेश प्रक्रियेकरीता पात्र विद्यार्थ्यांकडून online अर्ज मागणी करण्यात येत आहेत. याकरीता विद्यापीठ अधिकृत संकेतस्थळ www.unishivaji.ac.in येथे Ph.D. Admission २०२६—२७ येथे खालील लिंकवर भेट दयावी.

सदर प्रवेश प्रक्रिया University Grants Commission (Minimum Standards and Procedure for Award of Ph.D Degree) Regulations, 2022 दि. ७ नोव्हेंबर, २०२२ नुसार तसेच विद्यापीठ अधिकार मंडळाने वेळोवेळी मंजूर केलेल्या नियमानुसार राबविण्यात येत आहे.

**ऑनलाईन अर्जाची लिंक :** https://sukapps.unishivaji.ac.in/phd-entrance/#/login

- पीएच.डी. 'प्रवेश परीक्षा' शिवाजी विद्यापीठाद्वारे आयोजित करण्यात येईल.
- सदर प्रवेश परीक्षेची सविस्तर माहिती, ऑनलाईन अर्ज प्रक्रिया, प्रवेश क्षमता, परीक्षा केंद्र आणि पीएच. डी. नियमावली यासाठी विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या वेबसाईटवर Ph.D. Admission 2026-27 link: https://sukapps.unishivaji.ac.in/phd-entrance/#/login यावर भेट द्यावी. ऑनलाईन अर्ज भरण्याची सुविधा/कालावधी **दि. २९/०८/२०२६ दुपारी १२.०० वाजल्यापासून ते अंतिम दिनांक १९/०९/२०२६ अखेर मध्यरात्री १२.०० वाजेपर्यंत सुरु राहील.**
- ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी, उमेदवारांनी पीएच.डी. प्रवेशाबाबतची अधिसूचना, प्रवेश परीक्षेसंबंधीतच्या सविस्तर सूचना, विषयनिहाय व प्रवर्गनिहाय प्रवेश क्षमता आणि 'पीएच.डी. माहितीपुस्तिका २०२६—२७' (पीएच.डी. प्रोस्पेक्टस २०२६—२७) मधील संशोधन पदवीविषयक नियमावली (आर.आर.डी.) काळजीपूर्वक वाचावी व समजून घ्यावी.
- परदेशी उमेदवार वगळता, पीएच.डी. कार्यक्रमात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या सर्व उमेदवारांनी 'सामाईक प्रवेश परीक्षा' (CET) आणि मुलाखतीसाठी (Viva-Voce) ऑनर्लान अर्ज करणे आवश्यक आहे. (कृपया संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या 'पीएच.डी. माहितीपुस्तिका २०२६—२७' (पीएच.डी. प्रोस्पेक्टस २०२६—२७) मधील आर.आर.डी. ४.४ आणि ४.५ पहावे)
- परदेशी विद्यार्थ्यांना प्रवेश परीक्षेचे निकष लागू नाहीत तथापि पूर्वपरवानगी नंतर सदर विद्यार्थ्यांना मुलाखत देणे आवश्यक राहील. (कृपया माहितीपुस्तिकेतील R.R.D. 4.5. पहावे.) परदेशी विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत सविस्तर माहिती पीएच.डी. माहितीपुस्तिका २०२६—२७ मधील प्रपत्र— १५ मध्ये नमूद केलेली आहे.
- NET/JRF पात्र विद्यार्थ्यांनी पीएच.डी प्रवेश परीक्षेचा ऑनलाईन अर्ज भरणे अनिवार्य आहे. याकरिता खालील सूचना अवलोकनी घ्याव्यात.
- विद्यार्थ्यांनी पीएच.डी प्रवेश परीक्षेचा Online अर्ज भरण्यापूर्वी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या Ph.D. Admission Notification चे काळजीपूर्वक वाचन करुनच अर्ज भरण्याची कार्यवाही करावी.
- दि. २७ व २८ मार्च, २०२४ रोजीची युजीसीची Public Notice निर्गमित होण्यापूर्वी जे विद्यार्थी M.Phil., JRF/SRF, GPAT, GATE, NET/SET/SLET आहेत, अशा सर्व विद्यार्थ्यांना पीएच.डी. प्रवेश परीक्षा देणे अनिवार्य आहे.
- युजीसी च्या दि. २७ व दि. २८ मार्च, २०२४ रोजीच्या Public Notice नुसार जे विद्यार्थी NET अर्हताधारक आहेत. त्यांना पीएच.डी. PET परीक्षेतून सवलत/सूट देण्यात आली आहे. मात्र त्यांना पीएच.डी. प्रवेश प्रक्रीयेमध्ये समाविष्ठ होण्यासाठी प्रवेश प्रक्रीयेचा ऑनलाईन अर्ज भरणे अनिवार्य आहे.
- पीएच.डी. प्रवेश अर्ज नोंदणीच्या वेळी विद्यार्थी NET/ GPAT/ GATE इ. परीक्षा उत्तीर्ण असेल तर त्या परीक्षेचे गुण ऑनलाईन अर्जामध्ये नोंदवणे आवश्यक आहे व इतर M.Phil., JRF/SRF, GPAT, GATE, NET/SET/SLET परीक्षेसंदर्भात (Yes/No) हे पर्याय निवडणे आवश्यक आहे. अर्ज भरण्याच्या अंतिम तारखेनंतर मिळवलेल्या कोणत्याही पात्रता परीक्षेचे गुण मुलाखतीसाठी वैध मानले जाणार नाही. पीएच.डी. प्रवेश परीक्षेचा अर्ज एकदा Submit केल्यानंतर अर्जामध्ये कोणतेही बदल किंवा दुरूस्ती करण्याची परवानगी दिली जाणार नाही.
- **पीएच.डी. अभ्यासक्रमाबरोबर इतर कोणत्याही नियमित/ ऑनलाईन/ दूरशिक्षण अभ्यासक्रमास (Dual Degree प्रमाणे) प्रवेश घेता येणार नाही. तसे आढळल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता विद्यार्थ्यांचा पीएच.डी. अभ्यासक्रमाचा प्रवेश रद्द् करण्यात येईल याची नोंद घ्यावी.**

## महत्वाच्या सूचना:—

- ❖ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरताना खाली दिलेल्या सर्व सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. प्रवेश अर्ज भरल्यानंतर तो लॉक करण्यापूर्वी भरलेली माहिती काळजीपूर्वक वाचून पाहावी व अर्ज लॉक करावा. अर्ज लॉक केल्यानंतर त्यामध्ये कोणत्याही सुधारणा अथवा बदल करण्यासाठी भरलेल्या अर्जामध्ये काही दुरूस्त्या असतील तर त्या phd@unishivaji.ac.in या ईमेलवर दि. २१/०९/२०२६ पूर्वी कळवाव्यात, सदर तारखेनंतर प्राप्त झालेले/होणारे दुरूस्त्यांचे ई—मेल/पत्र विचारात घेतले जाणार नाहीत.
- ❖ पीएच.डी. प्रवेश परीक्षेचे सविस्तर वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर व परीक्षेचे प्रवेश ओळख पत्र विद्यार्थ्यांच्या लॉगिन (Personal Login) मध्ये डाऊनलोडिंग करीता यथावकाश उपलब्ध करण्यात येईल. पीएच.डी. प्रवेश परीक्षा ऑफलाईन स्वरूपात आयोजित केली जाईल व त्याबाबतच्या सूचना वेळोवेळी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केल्या जातील.
- ❖ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरताना परीक्षेसाठी कोल्हापूर, सांगली, सातारा यापैकी एका परीक्षा केंद्राचा पर्याय निवडावा.
- ❖ विद्यार्थ्यांनी प्रवेश परीक्षा सूचना, नियम व मार्गदर्शक तत्त्वे आणि माहितीपुस्तकेमधील विद्यापीठ नियमावली इत्यादींचे काळजीपूर्वक वाचन करून समजून घ्यावयात.
- ❖ **प्रवेश क्षमतेमध्ये तांत्रिक कारणास्तव बदल झाल्यास/ प्रवेश क्षमता कमी झाल्यास अशा वेळी प्रवेश प्रक्रिया स्थगित ठेवण्याचे अथवा पूर्ण करण्याचे अधिकार सर्वस्वी विद्यापीठाचे राहतील. याबाबतचे निर्णय विद्यार्थ्यांवर बंधनकारक राहतील.**
- ❖ महाराष्ट्र शासनाकडून वेळोवेळी लागू होणारे आरक्षणविषयक धोरण/नियम सदर प्रवेश प्रक्रियेस लागू राहतील.
- ❖ विद्यार्थ्यांनी पीएच.डी. अभ्यासक्रम प्रवेश परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी विषयनिहाय व प्रवर्गनिहाय उपलब्ध प्रवेश क्षमता तपासून पहावी. (विषयनिहाय व प्रवर्ग निहाय प्रवेश क्षमता, प्रवेश सुचनेबरोबर स्वतंत्ररित्या प्रसिध्द करण्यात आलेली आहे.) पीएच.डी. प्रवेश अर्ज भरताना विद्यार्थ्यांनी अर्जामध्ये त्यांच्या अचूक प्रवर्गाची नोंदणी करावी. प्रवेश अर्ज Submit केल्यानंतर प्रवर्ग बदलाबाबत कोणतीही दुरूस्ती स्विकारली जाणार नाही याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.
- ❖ अर्जामध्ये नोंदणी केलेल्या जातीचे प्रमाणपत्र व NCL किंवा इतर प्रमाणपत्रे विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष प्रवेश प्रक्रियेच्या मुलाखतीवेळी/कागदपत्रे पडताळणीवेळी सादर करणे आवश्यक आहे किंवा जात पडताळणी अर्ज दाखल केलेचे टोकन सादर करणे बंधनकारक आहे. विद्यार्थ्यांनी पीएच.डी. प्रवेश प्रक्रियेचा ऑनलाईन अर्ज भरताना त्यांच्या अर्जामध्ये नमुद केलेल्या प्रवर्गातूनच तो पुढील प्रवेश प्रक्रियेसाठी पात्र असेल.
- ❖ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन भरलेल्या अर्जाची छापील प्रत विद्यापीठास जमा करण्याची आवश्यकता नाही. तथापि, विद्यार्थ्यांनी भरलेल्या ऑनलाईन अर्जाची छापील प्रत काढून स्वत:च्या माहितीसाठी ठेवावी.
- ❖ **पीएच. डी. प्रवेश परीक्षेसाठी अराखीव प्रवर्गातील उमेदवारांसाठी ८५०/— रूपये व राखीव प्रवर्गातील उमेदवारांसाठी ६००/— रूपये शुल्क असेल. हे शुल्क ना परतावा आहे.**
- ❖ प्रवेश परीक्षा शुल्क ऑनलाईन पेमेंट गेटवे सुविधाद्वारे भरणा करता येईल.
- ❖ प्रवेश परीक्षा अर्ज हा प्रवेश परीक्षा शुल्क भरणा झाल्याची खात्री झाल्यानंतरच ग्राह्य धरण्यात येईल.
- ❖ पीएच.डी. प्रवेश पात्रतेच्या अटींच्या अधिन राहून, ज्या विद्यार्थ्यांना एकापेक्षा अधिक विषयांच्या प्रवेश परीक्षेकरीता अर्ज करावयाचा आहे, त्यांचेकरीता एकाच अर्जात एकापेक्षा अधिक विषयांसाठी प्रवेश परीक्षेचे अर्ज भरण्याची सुविधा उपलब्ध केली आहे. परंतु अशा विद्यार्थ्यांना प्रत्येक विषयाकरीता स्वतंत्र परीक्षा शुल्क भरावे लागेल व भरलेले शुल्क ना परतावा असेल.
- ❖ पीएच.डी. अभ्यासक्रमाच्या प्रवेश परीक्षेचे सविस्तर वेळापत्रक विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर Ph.D. Admission २०२६—२७ या लिंकवर उपलब्ध करण्यात येईल. त्यामुळे विद्यार्थ्यांनी प्रवेश परीक्षा व प्रवेश प्रक्रियेसंबंधीच्या अद्ययावत माहितीसाठी वेळोवेळी विद्यापीठ संकेतस्थळास भेट द्यावी.
- ❖ प्रवेश परीक्षा ही पीएच. डी. अभ्यासक्रम प्रवेशासाठीची पात्रता परीक्षा असून ही प्रवेश परीक्षा १०० गुणांची असेल. प्रत्येकी दोन गुणांचे ५० बहुपर्यायी प्रश्न असतील. प्रवेश परीक्षेमध्ये पात्र होणेकरीता खुल्या प्रवर्गातील उमेदवारांना कमीत कमी ५०% गुण व राखीव प्रवर्गातील उमेदवारांना ४५% गुण प्राप्त करणे आवश्यक आहे. (चूकीच्या उत्तरास गुण कपात करण्यात येणार नाही.)
- ❖ पीएच. डी. प्रवेशासाठीची अंतिम गुणवत्ता यादी या अभ्यासक्रमासाठी विहीत करण्यात आलेल्या नियमाच्या व पात्रतेच्या निकषाच्या आधारे तयार करण्यात येईल.
- ❖ सर्व साधारणपणे प्रवेश परीक्षेमध्ये संशोधन पध्दतीवर आधारीत प्रश्नांचा (५० गुणांसाठी) आणि संबंधित विषयावर आधारीत प्रश्नांचा (५० गुणांसाठी) समावेश असेल. प्रवेश परीक्षा विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात आलेल्या केंद्रावर आयोजित करण्यात येईल. प्रवेश परीक्षेचा सविस्तर अभ्यासक्रम विद्यापीठाच्या संकेतस्थळावर Admission Tab मध्ये उपलब्ध करून देण्यात आला आहे.
- ❖ ऑनलाईन अर्ज भरताना त्यामध्ये काही तांत्रिक अडचणी आल्यास संगणक केंद्राकडील ०२३१—२६०९०९६ या क्रमांकावर संपर्क करावा.
- ❖ तसेच अन्य माहितीकरीता विद्यापीठाच्या पी.जी.बीयुटीआर विभागाच्या ०२३१—२६०९२९६/९१३९ या क्रमांकावर संपर्क साधावा अथवा phd@unishivaji.ac.in या ई—मेलवर कळविण्यात यावे.

दिनांक. २९/०८/२०२६
स्थळ — कोल्हापूर

डॉ. व्ही. एन. शिंदे
कुलसचिव